# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 17/08/2021 (मंगळवार)

(दुपार)

---

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. खापरखेडा :– खापरखेडा पावरप्लान्ट एएचपी 02 जवळील काटाघर येथे दिनांक 15/08/2021 चे 23:45 वा. ते दिनांक 16/08/2021 चे 05:00 वा. दरम्यान आरोपी नामे– रविन्द्र अजबराव सरोदे, रा. भानेगाव वार्ड क्र. 3 हा त्याच्या ताब्यातील एमएमच– 40/बिजी– 0733 क्रमांकाचा अशोक लेलन्ड ट्रकने सिंगोरी खदान येथे कोळसा भरण्यास जात असतांना मित्र नामे– मोरेश्वर मारोती बन्सोड, वय 34 वर्ष, रा. भानेगाव यास टी पॉईन्ट वरून ट्रक चा कॅबीन मध्ये बसवुन सिंगोरी खदान येथुन कोळसा खाली करून पुन्हा खाली उतारण्यास सांगितले. तो डाव्या बाजुने खाली उतरला आणी आरोपीने कोणतीही काळजी न घेता हयगईने निष्काळजीपणे ट्रक पुढे लेफट साईडने वळवुन त्याचे अपघातास कारणीभुत ठरला. त्यामुळे त्याचे डाव्या हातास, पायास गंभीर दुखापत झाल्याने त्यास जखमी अवस्थेत सोडुन कोणाला माहिती न देता घटनास्थळावरून निघुन गेला. त्यामुळे मोरेश्वर बन्सोड हा जवळजवळ एक तास घटनास्थळावर जखमी अवस्थेत पडुन राहीला त्यामुळे त्याचा रक्तस्त्राव जास्त होवुन उपचारादरम्यान त्याचा मृत्यु झाला असे चौकशीत निषपन्न झाल्याने सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 134, 187 कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक दिपक रेवतकर हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर